नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १८० Issue - 180 | वार बुधवार दि. १९ नोव्हेंबर २०२५ Blow- Wednesday Date 19 November 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# महायुतीत तणाव, मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार

## मुख्यमंत्र्यांसोबतच्या कॅबिनेटला शिंदे सेनेची दांडी; शिंदे सेना-भाजपमध्ये राजकीय संग्राम सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात एकीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून नगरपालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपुष्टात आली आहे. त्यामुळे, राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायत निवडणुकीत काही ठिकाणी महायुती तर काही ठिकाणी स्वबळावर निवडणुका लढत असल्याचं पाहायला मिळालं. मात्र, राज्यातील अनेक नगरपालिकांमध्ये भाजपने शिवसेना शिंदे गटातील उमेदवार आपल्या पक्षात घेत त्यांना उमेदवारी दिली. त्यावरुन भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत राजकीय संग्राम सुरू झाल्याचं दिसून येत आहे. त्यामुळेच, आजच्या कॅबिनेट बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वगळता एकही शिवसेनेचा मंत्री उप-स्थित नव्हता. मात्र, यामागे नेमकं कारण काय अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज मंत्रालयात संपन्न झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीवर शिवसेना शिंदे गटाने अघोषित बहिष्कार टाकल्याचे दिसून आले.

मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी प्रत्येक पक्षाची प्री-कॅबिनेट बैठक होते. शिंदे गटाच्या प्री-कॅबिनेट बैठकीत शिवसे-नेचे सगळे मंत्री उपस्थित होते. मात्र, त्यानंतर काहीवेळातच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला यापैकी एकही मंत्री गेला नाही. केवळ एकनाथ






शिंदे उपस्थित होते. विशेष म्हणजे कॅबिनेटची बैठक आटोपल्यानंतर शिवसेनेचे सर्व मंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात पोहोचले. या दालनात सध्या देवेंद्र फडणवीस आणि शिवसेनेच्या मंत्र्यांची बैठक सुरु आहे. त्यामुळे, शिवसेना नेते आणि मंत्र्यांच्या नाराजीचं नेमकं कारण काय याची चर्चा होत आहे. त्यानुसार, प्राथमिक माहितीनुसार शिंदेंच्या मंत्र्यांच्या नाराजीची ६ कारणे समोर आली आहेत.

**शिवसेना मंत्र्यांच्या नाराजीची कारणे**

१. भाजप सेनेचे नेते ,नगरस-ेवक व पदाधिकारी यांचा पक्षप्रवेश आपल्या पक्षात करून घेत आहेत

२. विधानसभेला ज्यांच्या विरोधात निवडणुका लढल्या त्याच उमेदवाराला भाजप आपल्या पक्षात घेत आहे.

३. शिंदेच्या अनेक नेत्यांना किंवा पालकमंत्र्यांना विश्वासात न घेता अनेक निर्णय दिले जातात, तसेच निधी देखील वळवला जातो

४. राज्यात सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपकडून युतीचा धर्म पाळला जात नाही.

५. निधी मिळवण्यासाठी देखील शिवसेना आणि शिंदेच्या मंत्र्यांना तारे-वरची कसरत करावी लागत आहे.

६. संभाजी नगर, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, कोकण या ठिकाणी भाजपने असे प्रवेश करून घेतले जिथे युतीचा धर्म पाळला नाही.

**ठाकरेंच्या उपनेत्या सुषमा अंधारेंची टीका-** हे सर्व विधिलिखीत आहे. ज्याक्षणी एकनाथ शिंदेंनी व्हाया सुरत-गुवाहाटीचा रस्ता पकडला होता. त्याक्षणी भाजप कशा पद्धतीने वापरुन घेईल, हे त्यांच्या कपाळावर लिहून ठेवलेलं होतं. उदय सामंत यांच्यासमोर त्यांनी राणेंचं घर फोडून त्यांनी राणेंसमोर एक आव्हान उभं केलंय. दादा भुसे यांच्यासमोर आता एक अद्वय हिरेंचं आव्हान उभं केलंय. ज्या पद्धतीने शिंदेंच्या आमदारांसमोर भाजप एक-एक आव्हान उभं केलंय. त्यामुळे एकनाथ शिंदेंना आर्श्चय वाटायला नको. कारण एकनाथ शिंदेंनी स्वत:ला मुख्यमंत्रीपद मिळण्यासाठी या सगळ्यांना राजकीय आत्महत्या करण्यास भाग पाडले, असं सुषमा अंधारे म्हणाल्या. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय सम जूत काढतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह इकडे येऊन सांगताय आम्हाला कोणत्याही कुबड्यांची गरज नाही आणि ज्या पद्धतीने एकनाथ शिंदे आणि अजित पवारांच्या मागे भाजपने शुक्लकाष्ट लावलेलं आहे, त्यामुळे कुबड्या म्हणजे एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांना पद्धतशीरपणे बाजूला काढण्याचं काम भाजपकडून करण्यात येत आहे, असा दावाही सुषमा अंधारे यांनी केला.

## राज्यातील पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या; १० वी अन् १२ वी पुणे बोर्डाच्या अध्यक्षपदी त्रिगुण कुलकर्णी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच राज्यातील ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदलीचे (ढीरपीषशी) आदेश जारी करण्यात आले आहेत. आज १८ नोव्हेंबर रोजी प्राप्त बदली आदेशान-ुसार त्रिगुण कुलकर्णी यांची इयत्ता १० वी आणि १२ वी शिक्षण बोर्डाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्रिगुण कुलकर्ण हे सध्या पुण्यातील (झींपश) सनदी अधिकाऱ्यांसाठीची प्रशिक्षण संस्था असलेल्या यशदा येथे उपमहासंचालक पदावर कार्यरत होते. तसेच, राहुल रंजन महिवाल, प्रकाश खपले, डॉ. मंजिरी मानोलकर, अंजली रमेश या चार खड (खड) अधिकाऱ्यांचीही बदली करण्यात आली आहे.

आयएएस अधिकाऱ्यांचे सध्याचे ठिकाणी आणि बदली झालेला पदभार

१. राहुल रंजन महिवाल यांची म हाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे येथील व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

२. प्रकाश खपले आयुक्त, मृदा आणि जलसंधारण, छत्रपती संभाजी नगर यांची म हाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय महामंडळ, मुंबई येथील व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

३. डॉ. मंजिरी मानोलकर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे यांची आयुक्त, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

४. त्रिगुण कुलकर्णी उपमहासंचालक, यशदा, पुणे यांची अध्यक्ष, डडउ आणि कडउ बोर्ड, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

५. अंजली रमेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांची आयुक्त, मृदा आणि जलसंधारण, छत्रपती संभाजी नगर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## राष्ट्रपतींच्या हस्ते सहावे ‘राष्ट्रीय जल पुरस्कार’ प्रदान; महाराष्ट्राला ‘सर्वोत्कृष्ट राज्य’ पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय जलशक्ती मंत्रालयामार्फत जलव्यवस्थापन आणि संवर्धन क्षेत्रातील काम गिरीसाठी देण्यात येणाऱ्या सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांम ध्ये (२०२४) महाराष्ट्राला सर्वो त्कृष्ट राज्याचा पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्याच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. तसेच उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबई महापालिकेला प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला.




नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात झालेल्या सोहळ्यात राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय जल पुरस्कार - २०२४ प्रदान करण्यात आले. यावेळी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, जलशक्ती राज्यमंत्री राजभूषण चौधरी, राज्यमंत्री व्ही. सोमन्ना, विभागीय सचिव व्ही. एल. कांथाराव व विभागाचे सचिव अशोक, के. के. मीना यावेळी उपस्थित होते. मंत्री विखे पाटील यांच्यासोबत राज्याच्या जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर उप-स्थित होते.

या मानांकन स्पर्धेत गुजरा-तला दुसरा तर हरियाणाला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राष्ट्रपतींकडून विजेत्यांचे अभिनंदन

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी, आपल्या भाषणात, अमृता इतक्याच मौल्यवान असलेल्या जल संसाधनाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्वांचे कौतुक केले. भारतीय परंपरेमधे जलस्रोतांना पूजनीय मानले गेले आहे. पाण्याच्या संवर्धनासाठी काम करणारे कौतुकास पात्र आहेत, असे यावेळी राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्यावर्षी सुरू झालेल्या जलसंवर्धन जनसहभाग उपक्रम द्वारे ३५ लाखांहून अधिक भूजल पुनर्भरण संरचना उभारल्या गेल्या असे राष्ट्रपतींनी यावेळी सांगितले. देशात मर्यादित जलस्रोत असल्याने त्याचा वापर जपून करायला हवा आहे. हवामान बदलाचा जलस्रोतांवर परिणाम होत असून जलस्रोतांच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**महाराष्ट्राला ‘सर्वोत्कृष्ट राज्य‘ पुरस्कार अभिमानाची बाब**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र सदन येथे माध्यमांशी संवाद साधताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, महाराष्ट्राला ‘सर्वोत्कृष्ट राज्य’ म्हणून सन्मान प्राप्त होणे ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. राज्य शासनाने राबवलेल्या अभिनव जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, (पान २ वर....)


### राजन पाटलांचा हात; उमेश पाटलांचा गंभीर आरोप

# अनगरचा वाद पेटला! काहीतरी टेक्निक वापरुन उज्वला थिटेंच्या अर्जावरील सूचकाची सही गायब केली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : मोहा-ेळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतीचा वाद आता शिगेला पोहोचला आहे. नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादीच्या उज्ज्वला थिटे यांचा अर्ज बाद करण्यात आला. त्यानंतर राष्ट्रवादीचे नेते उमेश पाटील यांनी माजी आमदार राजन पाटील आणि प्रशासनावर आर-ोप केले आहेत. उज्ज्वला थिटे यांच्या अर्जावर सूचक म्हणून त्यांच्या मुलाची सही होती, ती निवडणूक अधिकाऱ्यांसमोर केली होती. तरीही सूचकाची सही नाही म्हणून अर्ज बाद कसा करण्यात आला? प्रशास-नाने काही टेक्निक वापरून सही गायब केली का याची चौकशी व्हावी अशी मागणी उमेश पाटलांनी केली.

सोलापुरातील अनगर नगरपंचायतीमध्ये माजी आमदार राजन पाटील यांच्या सूनबाईंच्या विरोधात राष्ट्रवादीच्या उज्ज्वला थिटे यांनी अर्ज दाखल केला होता. उज्ज्वला थिटे यांनी पोलीस संरक्षणामध्ये अर्ज दाखल केला होता. पण छाननीमध्ये त्यांचा अर्ज बाद करण्यात आला. त्याम ुळे राजन पाटील यांच्या सूनबाई अनगर नगरपंचायतीच्या पहिल्या नगराध्यक्षा बनणार आहेत.



दरम्यान, आपला अर्ज बाद करण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव होता. त्यामुळे प्रशासनाच्या या निर्णयाविरोधात आम्ही कोर्टात दाद मागू असं उज्ज्वला थिटे यांनी सांगितलं.

सून पहिली नगराध्यक्ष झाली पाहिजे यासाठी राजन पाटलांनी कट करुन अर्ज बाद केला. सूचक हा उज्ज्वला थिटे यांचा म ुलगा होता, त्याला विचारल्यावर त्याने सांगितलं चार वेळा आम्ही सह्या चेक केल्या होत्या. असं असताना देखील हा अर्ज बाद करण्यात आला आहे. आता तो अर्ज दाखवतो असं प्रशासन म्हणतं. पण प्रशासनाने काहीतरी टेक्निक वापरुन सूचकाची सही गायब केली आहे असा आरोप उमेश पाटलांनी केला.

अर्ज भरण्याआधी फॉर्म आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना पाठवलेला होता. सूचकाची सही प्रत्यक्ष निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या समोर करतात. अधिकाऱ्यांनी विचारलं, सूचक कोण आहे? तेव्हा त्यांच्या समोर सह्या केल्या. त्यामुळे सिसिटीव्ही कॅमेरा तपासले पाहिजे. त्या सीसीटीव्हीमध्ये आता छेडछाड होऊ नये, या सगळ्याची चौकशी व्हायला पाहिजे अशी मागणी उमेश पाटलांनी केली.

अर्ज भरल्यानंतर मूळ दस्-तऐवजाची झेरॉक्स आम्ही मागितली होती, प्रत्येक पानावर सही शिक्का द्या असं म्हटलं होतं. पण तसं देण्याती तरतूद नाही असं सांगत आम्हाला ते देण्यात आलं नाही. प्रत्येक पानाचं झेरॉक्स द्यायला काय हरकत होती? असा प्रश्न यावेळी उमेश पाटलांनी विचारला.

उमेश पाटलांनी राजन पाटील यांच्यावर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, निवडणुकीला सामोरं जायला तुम्हीच घाबरता? कसला आला बाहुबली? तुम्ही तुमची आमदारकी कशी टिकवली याचं उदाहरण दाखवणारी ही निवडणूक आहे. हिंमत असेल तर निवडणूकला सामोरं जायचं होतं, तुम्ही एका विधवा महिलेला घाबरला. स्वतः ला गुंड म्हणवून घेता आणि एका महिलेचा अर्ज घाबरून बाद करता?

प्रचाराला न येता ही आम्ही निवडणूक जिंकली असती. चार गुंड सोबत ठेवले म्हणून संपूर्ण गाव पाठीशी असल्याचे समजण्याचे कारण नाही असा टोला उमेश पाटलांनी लगावला. एका महिलेला घाबरून तुम्ही खेळलेला रडीचा डाव महाराष्ट्र बघतोय. या सगळ्याची चौकशी झाली पाहिजे, आम्ही देखील कायदेशीर बाजू तपासून बघत आहोत. तुम्ही काय राजकारण करता हे दाखवून द्यायला आम्ही उमेदवार दिला होता. प्रशासन या पद्धतीने कामं करतं का? राज्याचे निवडणूक आयोग काय करतंय? असे प्रश्न उमेश पाटील यांनी विचारले.

राष्ट्रवादीचे नेते उमेश पाटील म्हणाले की, या देशात लोकशाही अस्तितव आहे की नाही असा प्रश्न यामुळे होतो. प्रशासनावर किती दबाव आणला गेला हे अनगरधून दिसतंय. मोहोळ तालुक्यात चालणारे गुंडाराज आणि जंगलराज दाखवण-ारी निवडणूक म्हणजे अनगरची निवडणूक. एका महिलेला उम ेदवारी अर्ज भरण्यासाठी स्टेनगन घेऊन पोलिसाना जावं लागतं. हे जंगलराज मागील ७० वर्षांपासून आहे, बिनविरोध निवडणूक करण्यासाठी लोकशाहीची माती झाली तरी चालेल.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.
फक्त आमच्या कडेच



मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

# पुरुषांच्या निःशब्द संघर्षांचा समाजशास्त्रीय मागोवा

१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय पुरुष दिन' हा केवळ एका लिंगाच्या गौरवाचा दिवस नसून, पुरुषांनी समाजात निभावलेल्या विविध भूमिका, त्यांचे योगदान, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यांच्यावर होणाऱ्या अदृश्य सामाजिक दाबांविषयी गंभीर आत्मचिंतन करण्याची संधी उपलब्ध करून देणारा दिवस आहे. स्त्रियांप्रमाणेच पुरुष देखील संवेदनशील, भावनिक, कधी कमकुवत तर कधी अत्यंत सहनशील असतात; परंतु सामाजिक रचनेच्या पायामध्ये रुतलेली 'पुरुष म्हणजे बलाढ्य, कणखर, भावनाशून्य' ही गुंतागुंतीची प्रतिमा पुरुषांच्या अनेक समस्यांना गडद सावलीतच ठेवते. या न बोलल्या जाणाऱ्या संघर्षांमध्ये 'कामाच्या ठिकाणी पुरुषांवर होणारे खोटे आरोप' ही अत्यंत गंभीर आणि वाढत चाललेली समस्या आहे, जी पुरुषांच्या मानसिक आरोग्याला, कामाच्या सुरक्षिततेला, प्रतिष्ठेला आणि एकूण सामाजिक जीवनाला खोलवर बाधा पोहोचवते. या मुद्द्यावर वस्तुनिष्ठ, संतुलित आणि समाजशास्त्रीय नजरेतून विचार करणे आवश्यक आहे.

कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूक, वाईट वर्तणूक, नैतिक अध:पतन, अन्यायकारक वागणूक किंवा सत्ता शक्ती संबंधित प्रश्नांची तक्रार करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि स्त्रियांना वंचिततेच्या इतिहासामुळे कायदेशीर संरक्षणाची गरज देखील उद्भवते. परंतु संरक्षणाची रचना जेव्हा पक्षपाती समजुतींनी किंवा चुकीच्या वापरामुळे बिघडते, तेव्हा ती पुरुषांसाठी निःशब्द आपत्ती ठरू शकते. अनेक पुरुषांना कोणताही सबळ पुरावा नसताना आरोप झाल्यास ताबडतोब दोषी ठरवले जाते, चौकशी होण्यापूर्वीच त्यांच्या प्रतिमेवर बाजारातील धूळ उडते, नोकरीवर परिणाम होतो तर कधी वैयक्तिक आयुष्यही उद्ध्वस्त होते. खोटे आरोप हा स्त्री-पुरुष संघर्षाचा विषय नसून 'लिंगभाव रूढीवादा''शी संबंधित सामाजिक समस्या आहे हे वारंवार अधोरेखित करणे आवश्यक आहे.

भारतीय समाजरचना पितृसत्ताक असली तरी त्यातील भूमिका आणि अपेक्षा अत्यंत गुंतागुंतीच्या आहेत. पितृसत्तेला पुरुषांचे विशेषाधिकार म्हणून पाहिले जाते, परंतु त्याच प्रणालीच्या दबावाखाली पुरुषांवर 'कुटुंबाचा भार पेलणारा', 'आर्थिक आधार', 'शक्तिशाली संरक्षक' अशी सामाजिक अपेक्षा लादली गेली आहे. या चौकटीमुळे पुरुषांना मानसिक तणाव, भावनिक कोंडी, नैराश्य यांसारख्या समस्यांकडे स्वाभाविकपणे दुर्लक्ष करावे लागते. खोट्या आरोपांचे संकट हेही या दबावाशी जोडलेले आहे, कारण समाज सामान्यतः पुरुष म्हणजे दोषी असू शकतो या पितृतुल्य पूर्वग्रहातून प्रकरणांकडे पाहतो. यामुळे पुरुषांना स्वतःच्या निष्पापतेसाठी लढताना देखील अपराधीपणाचा कलंक सहन करावा लागतो.

कामाच्या ठिकाणचा सामाजिक स्तरिकरणाचा सिद्धांत सांगतो की शक्ती, श्रेणी, अधिकार आणि संसाधनांचे वितरण हे नेहमीच संघर्ष निर्माण करणारे असते. जेव्हा स्त्रियांना न्याय संरक्षणासाठी विशेष कायदे निर्माण केले गेले, तेव्हा त्या कायद्यांचा उद्देश अत्यंत योग्य होता. परंतु शक्तीचा गैरवापर हा सार्वत्रिक मानवी गुण असल्याने त्याचा वापर कोणत्याही लिंगाकडून चुकीच्या पद्धतीने केला जाऊ शकतो. अलीकडील काळात अधिकारसंपन्न पदांवरील वाद, बढतीच्या प्रक्रिया, वैयक्तिक वाद, कार्यस्थळातील स्पर्धात्मक मानसिकता किंवा एखाद्या पुरुषाची प्रतिमा खराब करण्यासाठीही खोट्या आरोपांचा वापर होत असल्याचे विविध अभ्यास, संस्थात्मक अहवाल आणि न्यायालयीन प्रकरणे दाखवतात. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर खोटे आरोप हे केवळ व्यक्तीगत वाद नसून स्वतंत्र ओळखीच्या संघर्षाचे, सत्तेच्या असमतोलाचे आणि संस्थात्मक रचनेतील त्रुटींचे प्रतिबिंब आहे.

पुरुषांवरील खोट्या आरोपांचा परिणाम शारीरिक नसला तरी मानसिकदृष्ट्या अत्यंत भयंकर असतो. पहिला आघात म्हणजे 'प्रतिष्ठेची हत्या', कारण समाजातील लोक आरोप झालेल्या पुरुषाकडे 'सत्य उलगडण्यापूर्वीच' संशयाने पाहतात. दुसरा परिणाम म्हणजे रोजगार हरवण्याची भीती. अनेक कंपन्या प्रकरणाचे सत्य समजून घेण्यापूर्वीच कर्मचाऱ्याला निलंबित करतात. काही वेळेस पुरुष आरोपी निष्पाप असल्याचे सिद्ध झाले तरी त्याच्या परत येण्याने सहकाऱ्यांमध्ये निर्माण झालेली दूरी, संशय, कुजबुज आणि तिरस्काराची भावना कायमच राहते. तिसरा आणि सर्वात खोलवर परिणाम म्हणजे मानसिक आरोग्याचा ऱ्हास होय. नैराश्य, असहायता, आत्मदोष, भीती, राग आणि कधी कधी आत्महत्येच्या विचारांपर्यंत परिस्थिती पोहोचते. संशोधन दर्शवते की प्रतिष्ठा आणि रोजगार या दोन गोष्टी पुरुषांच्या आत्मसन्मानाशी घट्ट निगडित असतात; आणि जेव्हा दोन्ही गोष्टी ढवळून निघतात तेव्हा व्यक्तीची मानसिक रचना उद्ध्वस्त होते.

समाजशास्त्रीय सिद्धांतांनुसार, कोणत्याही समाजात न्यायव्यवस्था ही तटस्थ असली पाहिजे; परंतु जेव्हा कायदे एका लिंगासाठीच संरक्षक आणि दुसऱ्यासाठी संभाव्य आरोपीचे स्थान निर्माण करतात, तेव्हा न्यायसंगततेचा समतोल ढासळण्याची शक्यता वाढते. पुरुषांविरोधातील खोटे आरोप हा स्त्रियांना दिलेल्या संरक्षणाचा विरोध नाही, तर त्या संरक्षणाचा निष्पक्ष वापर व्हावा यासाठीचा आग्रह आहे. उघड चर्चा टाळली जाते कारण अनेकांना भीती वाटते की पुरुषांवरील अन्यायाचा मुद्दा उपस्थित केला तर स्त्रियांच्या अधिकारवाढीच्या चळवळीला विरोध केल्याचा ठपका बसू शकतो. परंतु सामाजिक वास्तव हे कधीच एकतर्फी नसते. प्रत्येक समस्येचे अनेक थर असतात, आणि 'लिंगभाव न्याय' म्हणजे एका लिंगाचा विजय नव्हे तर दोन्ही लिंगांना न्याय देणारी समतोल प्रणाली होय.

कामाच्या ठिकाणी खोट्या आरोपांमुळे निर्माण होणारे सामाजिक वर्तुळसुद्धा महत्त्वाचे आहे. एक आरोप एखाद्या पुरुषाला केवळ आरोपी बनवत नाही, तर त्याच्या कुटुंबालाही सामाजिक नजरेत संशयास्पद बनवतो. पुरुषांच्या पत्नी, मुलं, आई-वडील या सगळ्यांना समाजाच्या प्रश्नांना उत्तर द्यावे लागते. या परिस्थितीमधून उभा राहणारा सामाजिक ताण हा लिंगनिर्भर नसून कौटुंबिक ताण असतो. आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पहिल्यास संस्थात्मक आरोप, न्यायप्रक्रियेतील विलंब, संस्थात्मक अविश्वास आणि सार्वजनिक प्रतिषेध हे सर्व त्या कुटुंबाच्या सामाजिक भांडवलावर गदा आणतात.

या समस्येचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे 'पुरुषांची शांतता' होय. पुरुषांना त्यांच्या समस्या बोलून दाखवण्यास समाज परवानगीच देत नाही. तू पुरुष आहेस, तग धरा, काही नाही होत अशाने, तुझ्यावर कोण विश्वास ठेवेल? अशा सामाजिक अपेक्षा पुरुषांच्या तोंडावरच कुलूप लावतात. पुरुषांच्या समस्यांसाठी समर्पित मानसिक आरोग्य सेवा, समुपदेशन केंद्रे, कायदेशीर मार्गदर्शन संस्था किंवा समता मंच अत्यल्प आहेत. कारण समाजाने पुरुषांना कधीही 'पीडित' म्हणून पाहिलंच नाही. अशा परिस्थितीत खोट्या आरोपांचा मुद्दा हा केवळ कायदेशीर विषय राहत नाही; तो सामाजिक चेतनेचा, भावनिक न्यायाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रश्न ठरतो.

आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहिले तरी विविध देशांमध्ये 'पुरुषांचे हक्क' किंवा 'लिंगभाव तटस्थ कायदे' यांविषयी चर्चा वाढत आहे. अनेक विकसनशील आणि विकसित देशांमध्ये कायदे लिंगभाव निरपेक्ष करण्याची मागणी वाढत चालली आहे, कारण वास्तव असे आहे की 'अन्याय हा स्त्री-पुरुष दोघांवरही होऊ शकतो'. कार्यस्थळातील तक्रार निवारण समित्यांनीही दोन्ही बाजूंची बाजू निष्पक्षपणे ऐकून निर्णय देण्याची गरज आहे. 'सिद्ध होईपर्यंत दोषी' अशी प्रतिकूल न्यायसंस्कृती पुरुषांमध्ये फोफावू नये. आरोप योग्य असल्यास कडक कारवाई व्हावी, पण आरोप खोटे असल्यास तितक्याच कठोरपणे त्या गैरवापराचीही दखल घेतली जावी, हेच न्यायाचे संतुलन असावे.

या सर्व विचारांमधून उलगडते की पुरुषांवरील खोट्या आरोपांचा प्रश्न हा केवळ काहींना भेडसावणारी समस्या नाही; ती 'समाजाच्या समतोलाच्या आणि न्यायव्यवस्थेच्या गुणवत्तेच्या' मापदंडाकडे बोट दाखवते. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा उद्देश पुरुषांचे गौरवगान करणे नसून त्यांच्या निःशब्द संघर्षांना समाजाच्या केंद्रस्थानी आणणे हा आहे. पुरुषांनी कमकुवत होण्यास किंवा वेदना व्यक्त करण्यास कोणतीही लाज वाटू देऊ नये; समाजानेही पुरुषांच्या वेदनांना समजून घेण्याचा मानवी दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुरुष दिवसाच्या निमित्ताने, समाज म्हणून आपल्याला हे मान्य करावे लागेल की 'जेंडर जस्टिस म्हणजे दोन्ही बाजूंच्या वेदनांना समान न्याय देणे होय'. स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठीचे कायदे महत्त्वाचे आहेत, पण त्याचबरोबर पुरुषांना खोट्या आरोपांपासून संरक्षण देणारी संवेदनशील आणि तटस्थ चौकट उभी करण्याची गरजही तेवढीच मोठी आहे. नातेसंबंध, कार्यसंस्कृती आणि समाजव्यवस्था एका लिंगाच्या आधारावर नव्हे तर मानवी मूल्यांच्या आधारावर उभी राहिली पाहिजे. पुरुषांचे योगदान, त्यांची सहनशीलता, त्यांचे मानसिक संघर्ष आणि त्यांच्यावर होणारे संभाव्य अन्याय हे सर्व समाजाच्या अभ्यासाचा, चर्चेचा आणि धोरणनिर्मितीचा विषय बनले पाहिजे.

एक संतुलित, न्याय्य आणि मानवी मूल्यांनी युक्त समाज निर्माण करण्यासाठी पुरुष आणि स्त्रियांमध्ये संघर्ष नव्हे तर संवाद आवश्यक आहे. खोटे आरोप हा संवाद तोडणारा घटक आहे आणि त्यामुळेच त्यावर चर्चेची गरज अधिक महत्वपूर्ण ठरते. पुरुषांच्या निःशब्द संघर्षांना आवाज देणे म्हणजे स्त्रीहिताच्या विरोधात जाणे नव्हे, तर न्यायाच्या तत्त्वांना उंचावणे आहे. कारण जिथे न्याय सर्वांसाठी आहे, तिथेच समाज अधिक समतोल, संवेदनशील आणि प्रगतिशील होऊ शकतो.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२, ईमेल –**
bagate.rajendra5@gmail.com

## संपादकीय....

### महाराष्ट्राचा सन्मान

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयामार्फत जलव्यवस्थापन आणि संवर्धन क्षेत्रातील कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमध्ये (२०२४) महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्याचा पुरस्कार नुकताच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राज्याच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. या मानांकन स्पर्धेत गुजरातला दुसरा तर हरियाणाला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी, आपल्या भाषणात, अमृता इतक्याच मौल्यवान असलेल्या जल संसाधनाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या सर्वांचे कौतुक केले. भारतीय परंपरेमधे जलस्रोतांना पूजनीय मानले गेले आहे. पाण्याच्या संवर्धनासाठी काम करणारे कौतुकास पात्र आहेत, असे यावेळी राष्ट्रपती म्हणाल्या. गेल्यावर्षी सुरू झालेल्या जलसंवर्धन जनसहभाग उपक्रमाद्वारे ३५ लाखांहून अधिक भूजल पुनर्भरण संरचना उभारल्या गेल्या असे राष्ट्रपतींनी यावेळी सांगितले. देशात मर्यादित जलस्रोत असल्याने त्याचा वापर जपून करायला हवा आहे. हवामान बदलाचा जलस्रोतांवर परिणाम होत असून जलस्रोतांच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे असे आवाहन त्यांनी केले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र सदन येथे महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट राज्य' म्हणून सन्मान प्राप्त होणे ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. राज्य शासनाने राबवलेल्या अभिनव जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, पाणी वापर संस्था तसेच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय आहे.

## राष्ट्रपतींच्या हस्ते सहावे 'राष्ट्रीय जल पुरस्कार' प्रदान; महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट राज्य' पुरस्कार

(पान १ वरून..) पाणी वापर संस्था तसेच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय आहे. बंद नलिका वितरण प्रणाली, उपसा सिंचन प्रकल्पांचे आधुनिकीकरण, नदी जोड प्रकल्प, पम्पिंग स्टोरेज योजना, जलाशयांवर फ्लोटिंग सौर प्रकल्प आणि सांडपाणी शुद्धीकरण-पुनर्वापर या सहा अभिनव संकल्पनांमुळे महाराष्ट्राला हे यश मिळाल्याचे मंत्री विखे-पाटील यांनी नमूद केले. महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रमुख यशासोबतच महाराष्ट्रातील इतर दोन संस्थांनाही महत्त्वाच्या श्रेणींमध्ये पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था या गटात नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम क्रमांक पटकावला. हा पुरस्कार आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी स्वीकारला. सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्था नाशिक जिल्ह्यातील कनिफनाथ जल/पाणी वापर सहकारी संस्थेला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष आणि इतर पदाधिकारी यांनी स्वीकारला.

## निष्क्रिय मालमत्ता शोधण्यासाठी राज्यभर शिबिरांचे आयोजन; मुंबई उपनगरात २१ नोव्हेंबरला मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वित्तीय सेवा विभाग, अर्थ मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सल्ल्यानुसार राज्यस्तरीय बँकर्स समिती (एसएलबीसी) महाराष्ट्र व जिल्हा अग्रणी बँकेतर्फे राज्यात हक्क न सांगितलेल्या मालमत्तेचा निपटारा या उपक्रमांतर्गत शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा उद्देश विविध बँका व वित्तीय संस्थांमधील दीर्घकाळापासून निष्क्रिय ठेवी, शेअर्स, लाभांश, विमा पॉलिसी, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) यांसारख्या मालमत्तेबाबत जनजागृती करणे आणि योग्य हक्कदारांना माहिती उपलब्ध करून देणे हा आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील शिबिराचे आयोजन २१ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात येणार असून, हा मेळावा उत्तर भारतीय संघ, टीचर्स कॉलनीच्या मागे, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे सकाळी १०.०० ते दुपारी २.०० या वेळेत होणार आहे.

शिबिरादरम्यान नागरिकांना निष्क्रिय खात्यांची माहिती, दाव्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन, तसेच संबंधित बँक अधिकाऱ्यांशी थेट संवादाची सुविधा उपलब्ध होणार आहे. याशिवाय ऑनलाइन पोर्टलद्वारे मालमत्तेची तपासणी करण्यास मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

राज्यस्तरीय बँकर्स समितीने नागरिकांना आवाहन केले आहे की, या शिबिरात सहभाग घेऊन स्वतःची किंवा कुटुंबीयांच्या निष्क्रिय ठेवी व वित्तीय मालमत्ता तपासून आवश्यक दावा सादर करावा. वरिष्ठ बँक अधिकारी, जिल्हा प्रशासनाचे प्रतिनिधी आणि संबंधित संस्थांचे अधिकारी या शिबिरात उपस्थित राहणार आहेत.

## मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करा; केंद्र सरकारकडून बिबट नसबंदीची मान्यता : वनमंत्री गणेश नाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासाठी प्रस्तावित कामांकरिता लागणारा निधी व त्याकरिता प्रस्तावाची मागणी तात्काळ सादर करावी, तसेच कृत्रीम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर व जागतिक स्तरावरील सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात, बिबट नसबंदीबाबत केंद्राची मान्यता प्राप्त झाली असून त्याबाबतची कार्यवाही करावी, अशा सूचना वनमंत्री गणेश नाईक यांनी दिल्या.

वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या सभागृहात मानव-बिबट संघर्ष उपाययोजनांबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. सामाजिक वनीकरणाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, मल्लिकार्जुन,मुख्य वनसंरक्षक, नाशिक, आशिष ठाकरे, वनसंरक्षक पुणे वनवृत्त महादेव मोहिते, उपवनसंरक्षक पुणे, प्रशांत खाडे, उपवनसंरक्षक जुन्नर, श्रीधर्मबीर सालचिठठल, उपवनसंरक्षक अहिल्यानगर, विवेक होशिंग, उपवनसंरक्षक वन्यजीव जयरामगौडा, उपवनसंरक्षक शिक्षण कुलराज सिंह, उपवनसंरक्षक सोलापूर सिध्देश सावडेकर उपवनसंरक्षक नाशिक, पंकज गर्ग उपवनसंरक्षक सामाजिक वनीकरण यांच्यासह वनअधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. श्री. नाईक यांनी नाशिक मधील वनकर्मचारी यांच्यावर झालेल्या बिबट हल्लाप्रकरणी संबंधित वनकर्मचारी यांची भेट घेऊन त्यांचे मनोबल वाढविले. मानव-बिबट संघर्षाबाबत वनकर्मचारी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करीत आहेत, त्यांना आवश्यक ते सर्व साहित्य पुरविण्यात यावे. जिल्हा योजनेमधून आकस्मिक निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे. बांबू लागवड करुन बिबटला अटकाव करता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करावा , अशा सूचना श्री. नाईक यांनी दिल्या. श्री. खांडेकर यांनी बैठकीत ऊस शेती, बिबट अधिवास व त्याकरीता प्रभावी उपाययोजनांबाबत माहिती दिली. यामध्ये साखर कारखान्यांनी करावयाची कार्यवाही, टायगर फाऊंडेशनवर आधारित नियोजन तसेच बिबट्यांची गणना करणे, बिबट्यांचे मायक्रोमॅपिंग, पोल्ट्री वेस्ट तसेच हॉटेल वेस्टची विल्हेवाट, रेस्क्यू सदस्यांचा विमा काढणे, बेस कॅम्पचे सक्षमीकरण करणे, कुरण विकास करून बिबट्यांकरीता अधिवास तयार करणे, मेंढपाळ, ऊस कामगार आदीकरिता विविध उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. श्री. खाडे यांनी मानव-बिबट संघर्षाबाबत केलेल्या उपाययोजनाबाबतचे सादरीकरण केले. तर श्री. मोहिते यांनी टीटीसी बावधन मधील कामांबाबतची माहिती दिली. जून २०२६ पर्यंत ८० पेक्षा अधिक बिबट्याकरिता उपचार उपलब्ध करुन देणार असल्याचे सांगितले. श्री. ठाकरे यांनी पिंपरखेड मधील शोध अभियान चालू ठेवण्याबाबत सूचना दिल्या आणि यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना केली. तसेच बिबट्यांच्या संख्या नियंत्रणासाठी इम्युनो-कॉन्ट्रासेप्टीव्ह पध्दतीची केंद्र शासनाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे त्यांनी यावेळी म्हणाले.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी आणि विकसित महाराष्ट्र २०४७ संदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न** — **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

## सार्वजनिक विद्यापीठांनी शैक्षणिक गुणवत्ता आणि राष्ट्रीय रँकिंग उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय रँकिंग सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, यासाठी प्रत्येक विद्यापींठात डिजिटल मॉनिटरिंगसाठी डॅशबोर्ड तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.




वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ) अंमलबजावणी आणि विकसित महाराष्ट्र २०४७ संदर्भात आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, उपसचिव प्रताप लुबाळ, सहसचिव संतोष खोरगडे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू, प्र-कुलगुरू उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, उच्च शिक्षणातील शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, पायाभूत सुविधा, विद्यापीठ रँकिंगची सध्याची असलेली स्थिती याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय-आतंरराष्ट्रीय पातळीवर विद्यापींठाचे रँकिंग वाढवण्यासाठी कृती आराखडा तयार करुन कालबद्ध नियोजन करावे. या कृती आराखड्याला अधिक गती देण्यासाठी ऑनलाईन डॅशबोर्ड तयार करावा, यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल.

जागतिक स्पर्धेच्या युगात शैक्षणिक गुणवत्ता आणि कुशल मनुष्यबळ निर्माण करून रोजगार निर्मितीसाठी उद्योग क्षेत्राशी करार, इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप, कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम तयार करून रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न करावेत. खासगी विद्यापीठात नवनवीन कल्पना/ अभ्यासक्रम पुढे येत आहेत तसे सार्वजनिक विद्यापीठांनी गुणवत्तेकडे अधिक लक्ष द्यावे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी विकसित महाराष्ट्र २०४७ पर्यत सार्वजनिक विद्यापीठाचे उद्दिष्टे, राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांची नॅशनल इन्स्टिटयूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एआयआरएफ) रँकिंग सुधारणा,शैक्षणिक सुविधा संदर्भात विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, यांनी सादरीकरण केले. बैठकीत खालील मुद्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली :-

एनआयआरएफ मध्ये सार्वजनिक विद्यापीठांची क्रमवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे, महाराष्ट्राला जागतिक शिक्षणाचे गंतव्यस्थान बनवणे:राज्याबाहेर जाणारे विद्यार्थी रोखणे आणि एनआरआय व परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करणे, उच्च-टीआरएल(टेक्नॉलॉजी रेडीनेस लेव्हल)संशोधन आणि व्यावसायिकदृष्ट्या मौल्यवान पेटंट्स निर्माण करणे, महाविद्यालयांमधील शिक्षणाची पातळी उंचावणे आणि विद्यार्थ्यांना जागतिक रोजगारासाठी तयार करणे., अभ्यासक्रमांना भावी रोजगार बाजारातील कौशल्ये आणि ज्ञानाच्या मागण्यांशी सरेखित करणे., जागतिक विद्यापीठांशी सहयोगासाठी विद्यापीठांच्या साधनसंपत्तीचा उपयोग करणे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अणुऊर्जेपासून वीज निर्मिती उपक्रमामध्ये सहभागी होणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

## महाजेनको – एनपीसीआयएल सामंजस्य करार; 'महाराष्ट्र स्वच्छ ऊर्जेत अग्रणी राज्य बनणार' : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अणुऊर्जेचा वापर ऊर्जा निर्मिती करताना या क्षेत्रात राज्यांचा सहभाग घेण्यासाठी केंद्र सरकार पावलं टाकत आहे. अणुऊर्जेपासून वीज निर्मिती उपक्रमामध्ये सहभागी होणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरत असून स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने महाराष्ट्राने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वर्षा या शासकीय निवासस्थानी महाराष्ट्र राज्य पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (महाजेनको) आणि न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एनपीसीआयएल) यांच्यात सामंजस्य करार झाला.

या कार्यक्रमाला ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनपीसीआयएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बी. सी. पाठक, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन ('मित्रा')चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, महाजनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, 'मित्रा'चे सहमुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल तसेच महाजेनको व एनपीसीआयएलचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले , देश जलद गतीने विकसित होत आहे आणि विकासाचा मुख्य आधार म्हणजे स्वच्छ व विश्वासार्ह ऊर्जा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी 'स्वच्छ ऊर्जा-सक्षम राष्ट्र' धोरणामुळे अणुऊर्जेतून वीज निर्मितीसाठी राज्यांचा सहभाग वाढविला जाणार आहे.

त्यांनी पुढे सांगितले, आतापर्यंत अणुऊर्जा क्षेत्र हे केंद्र सरकारचे कार्यक्षेत्र आहे. परंतु महाजनको प्रथमच एनपीसीआयएलसोबत या उपक्रमात सहभागी होत आहे. हा सामंजस्य करार अत्यंत योग्य वेळी झाला आहे. डेटा सेंटरचे सर्वात महत्त्वाचे इंधन म्हणजे स्वच्छ ऊर्जा आणि त्यासाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र ही देशाची 'डेटा सेंटर कॅपिटल' बनत आहे. जवळपास ५०-६०% डेटा सेंटर क्षमता महाराष्ट्रात असून ती सातत्याने वाढत आहे, असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एनपीसीआयएलच्या या क्षेत्रातील नावलौकिक आणि अनुभवाचा फायदा महाराष्ट्रासाठी होईल. राज्य सरकार या प्रकल्पात पुढाकार घेऊन सक्रिय राहील आणि आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासन देईल. महाजनको, ऊर्जा विभाग, मित्रा यांनी या दृष्टीने टाकलेले पाऊल हे महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्रातील एक ऐतिहासिक महत्वपूर्ण घटना ठरत आहे असा अभिमानास्पद उल्लेख मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला

यावेळी महाजनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. एनपीसीआयएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बी. सी. पाठक यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी एनपीसीआयएलचे संचालक (तांत्रिक) बी. राजेश, अतिरिक्त संचालक जितेश अरोरा, प्रतीक अग्रवाल, नितीन जावळे, सल्लागार बी. बी. एस. शेखर , संचालक प्रकल्प एन. के. मिठा , तसेच महाजनकोचे संचालक (वित्त) मनीष वाघेरकर, संचालक (ऑपरेशन) संजय मारुडकर, कार्यकारी संचालक (प्रकल्प) राजेश पाटील उपस्थित होते.

२०४७ पर्यंत स्वच्छ ऊर्जा निर्मितीसाठी रोडमॅप

सध्याच्या वीज निर्मिती तंत्रज्ञानामध्ये पारंपारिक जीवाश्म इंधन आणि नैसर्गिक स्रोतांसह पर्यावरणीय परिणाम करणारे घटक आहेत. जीवाश्म इंधन (कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू) हे जागतिक विजेचे प्रमुख स्रोत राहिले आहेत, परंतु त्यांच्या वापरामुळे हवा आणि जल प्रदूषण, पॉवर प्लांट उत्सर्जनामुळे होणारे वातावरणातील परिणाम, संसाधनांचा ऱ्हास व कचरा विल्हेवाट यातील धोके समोर आलेले आहेत.

वीज निर्मिती तंत्रज्ञानमध्ये अणुऊर्जे सह सौर आणि पवन यासारख्या अक्षय स्रोतांचे वर्चस्व वाढत आहे. यामध्ये प्रामुख्याने अक्षय ऊर्जा तंत्रज्ञानाची जलद वाढ, ऊर्जा साठवणुकीचे एकत्रीकरण आणि विकेंद्रित निर्मिती आणि स्मार्ट ग्रिड तंत्रज्ञानाचा विस्तार यांचा समावेश आहे.

भारताचे २०४७ पर्यंत ३० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट आहे, ज्यासाठी ऊर्जा क्षेत्रात मोठे बदल आवश्यक असून. वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी आणि २०७० पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी, कमी जीवनचक्र सीओ२ उत्सर्जन होईल. २४ तास विद्युत निर्मितीमुळे अणुऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा आहे.

देश ८,८८० मेगावॅट स्थापित क्षमतेसह सात ठिकाणी २५ अणुभट्ट्या चालवतो. ८ अणुभट्ट्या बांधकामाधीन आहेत, ज्यामध्ये ५०० मेगावॅटचा प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर अणुभट्टीचा समावेश आहे. दहा अतिरिक्त अणुभट्ट्यांमध्ये सात हजार मेगावॅट नियोजन होत आहे. यासाठी केंद्र सरकारने लघु मॉड्यूलर अणुभट्टी (एसएमआर) विकासासाठी २० हजार कोटी रुपये निधी तरतूद केली आहे.

२०४७ पर्यंत औद्योगिक उत्पादन - विशेषतः स्टील, सिमेंट आणि ॲल्युमिनियममध्ये झपाट्याने वाढ होण्याची अपेक्षा आहे. अणुऊर्जा प्रकल्प उच्च प्लांट घटकांसह आणि कमीत कमी व्यत्ययांतून सतत कार्यरत राहून बेस लोड पॉवर स्टेशन म्हणून काम करतात. महाराष्ट्रातील औद्योगिक विकासामध्ये औद्योगिक क्षेत्रातील वीज पुरवठा मागणीमुळे २४ तास विद्युत पुरवठ्यासाठी अणुऊर्जा वापरामुळे ऊर्जा क्षेत्र योग्य बनत आहे.

# प्रभाग क्रमांक ४ मध्ये अविनाश रेवप्पा मडिखांबे आणि सौ. अंजना लक्ष्मण कामनुकर यांचा शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ प्रभाग क्रमांक ४ मध्ये रिपाइं ( आठवले) गटाचे तालुका अध्यक्ष अविनाश रेवप्पा मडीखांबे व अंजना कामनुरकर यांचा आज शेवटच्या दिवशी शक्तिप्रदर्शन करत पारंपरिक पद्धतीने वाजत गाजत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.



यावेळी अविनाश मडीखांबे यांना मानणारा मोठा वर्ग उपस्थित होता पहिल्यांदाच आपला जुना वार्ड सोडून नव्याने राखीव असलेल्या प्रभाग ४ मध्ये अविनाश मडीखांबे निवडणूक लढवत असून कार्यकर्ते , मतदार यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण आहे उमेदवारी अर्ज दाखल करते वेळी माजी नगरसेवक विनोद मोरे मातंग समाज अध्यक्ष कृपेंद्र ढाले,तुळजाराम यारोळे,स्वामीनाथ घोडके,अभी मोरे ,प्रा.राहुल रुही,अजय मुकणार,कोलाटी समाजाचे प्रमुख विक्रम शिंदे ,राजू अंधारे ,चंदू कोलाठी, युनूस दरेभाऊ, शुभम मडीखांबे, प्रशिक बनसोडे,प्रणेश बनसोडे, विजयकुमार बाळशंकर,भारत सोनकांबळे,दत्ता मडिखांबे,विरपक्ष माने,अजय यारोळे दीपक यारोळे राजू यारोळे शिवानंद यारोळे, मनोज राराेळे,मलप्पा यारोळे,सचिन यारोळे, अनिल अदोडगीकर भीमा अदोडगीकर,रवी ग्वल, गुरप्पा ग्वल,यालप्पा राजू याराेळी,मास कोळी, कुमार कोळी, यालप्पा कोळी, तिपन्ना साबळे, रामचंद्र भांगे, शंकर यारोळी, अशोक कोळी, संजय कोळी,गोपीनाथ यारोळी विकास गायकवाड युवा वर्ग, मोठ्या प्रमाणात महिला, मतदार उपस्थित होते

# नशा मुक्त भारत अभियान शपथ



शासनाच्या परिपत्रकानुसार आज दि. १८ नोव्हेंबर ला सकाळी १०.३० वाजता अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे शालेय परिसरात सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी नशा करणार नाही. अशी शपथ घेतली.

– छायाचित्र मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया

# बार्टी संस्थेमार्फत संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा मुलाखत परीक्षा २०२५ साठी आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा मुलाखत परीक्षा (UPSC Civil - Personality Test Examination) या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. २५,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी संघ लोकसेवा आयोगाने -नागरी सेवा मुख्य परीक्षेचा निकाल घोषित केला आहे. सदर निकालानुसार संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा (Personality Test Examination) पात्र असलेल्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु. २५,०००/-चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in NOTICE BORD UPSC Cvil Service - Personality Test Examination 2025 Financial assistance Scheme येथे भेट द्यावी.

# भरती परीक्षेच्या निकालानंतर किमान चार दिवसात नियुक्तीपत्र द्यावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शासकीय सेवांमध्ये विविध पदांच्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर विहित कार्यपद्धती अवलंबत किमान चार दिवसांमध्ये संबंधित उत्तीर्ण उमेदवाराला नियुक्तीपत्र देण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. दरवर्षी जानेवारी महिना संपेपर्यंत उपलब्ध पदोन्नतींच्या जागांनुसार ७५ टक्के पदोन्नती देण्याचे निर्देशही दिले. नागरिक केंद्रित, जबाबदार आणि सुशासनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय सुधारणा करण्यात येत असून या सुधारणांमध्ये प्रत्येक विभागाने सक्रिय सहभाग नोंदवित आपला ठसा उमटवावा, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वर्षा निवासस्थानी सुशासनासाठी प्रशासकीय सुधारणा (गुड गव्हर्नन्स री-इंजीनियरिंग) बाबत सादरीकरण बैठक झाली. याप्रसंगी मुख्यमंत्री श्री फडणवीस आढावा घेताना निर्देशित करीत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पदोन्नती हा प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय असतो. शासकीय सेवेत असताना पदोन्नती मिळाल्यानंतर मिळालेली जबाबदारीही यशस्वीपणे सांभाळण्याची क्षमता निर्माण होते. त्यामुळे दरवर्षीचा आढावा घेत जानेवारी अखेरपर्यंत विभागांनी ७५ टक्के पदोन्नती देण्याची कार्यवाही केली पाहिजे. या बाबीवर विभागांचे 'रँकिंग' करण्यात यावे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रशासकीय सुधारणांमध्ये मागे पडलेल्या विभागांनी गतीने कार्यवाही पूर्ण करीत विभागाचे कार्य ठळकपणे अधोरेखित करावे. प्रत्येक विभागाने रिक्त पदांच्या संख्येनुसार आपले मागणी पत्र द्यावे, तसेच कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण घेत, त्यांची क्षमता वृद्धी करावी. शासनाच्या प्रत्येक विभागाने नियुक्ती नियम अद्ययावत करावे. बिंदू नामावली तपासून अचूक असल्याची खात्री करून घ्यावी. ही सर्व प्रक्रिया राबवितांना कालमर्यादेचे पालन करावे. विभागाने नियुक्ती नियम अद्ययावत करताना संबंधित पदाला सद्यस्थितीत आवश्यक असलेल्या जबाबदाऱ्यानुसार करावे. जेणेकरून भविष्यात या नियमांमध्ये तातडीने बदल करावे लागू नये, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. नागरिकांना सर्व सेवा विनाविलंब, सहजपणे उपलब्ध होण्यासाठी आपले सरकार २.० पोर्टल कार्यान्वित करण्यात यावे. राज्यात असलेले आपले सरकार केंद्र, सेतू केंद्र यांचे सक्षमीकरण करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी सुचित केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सर्व विभागांच्या प्रशिक्षण संस्था एका छताखाली आणण्यात याव्यात. या प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून नियमित प्रशिक्षणाचा प्रभावी कार्यक्रम राबविण्यात यावा. सद्यस्थितीत आवश्यकतेनुसार विभागांनी प्रशिक्षण घेण्यात यावे. प्रशासनाच्या सुधारणांमध्ये विभागांनी आपला सहभाग नोंदवण्याचे आवाहनही त्यांनी केले. बैठकीत अप्पर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा आणि समग्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव गोयल यांनी सादरीकरण केले. बैठकीस मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (प्रशासकीय सुधारणा) राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) इकबाल सिंह चहल, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव उपस्थित होते.

**योग्य वेळी केलेली कृती भविष्यातील गंभीर धोके टाळू शकते**

**सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण प्रकल्प उद्घाटन कार्यक्रम**

# नाही म्हणता आलं पाहिजे : डॉ. गौरी कहाते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /प्रतिनिधी : मुले आणि मुली कुठेही पूर्णपणे सुरक्षित नाहीत, हे दररोजचे वर्तमानपत्र वाचले की प्रकर्षाने जाणवते. मुलांना चांगला व वाईट स्पर्श यातील फरक समजला पाहिजे. 'माझे शरीर माझे' ही जाणीव प्रत्येक मुलामध्ये रुजली पाहिजे. कोणतीही व्यक्ती आपल्या शरीरावर अयोग्य प्रकार करत असेल, तर त्याला ठामपणे 'नाही' म्हणता आले पाहिजे व असा प्रकार लगेच उघडकीस आणला पाहिजे. अशा कृतीला विरोध करणे, आवाज उठवणे आणि त्याची तक्रार पालक, कुटुंबातील सदस्य, शिक्षक किंवा पोलिसांकडे करणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य वेळी केलेली कृती भविष्यातील गंभीर धोके टाळू शकते, असे प्रतिपादन अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान, कोल्हापूरच्या अध्यक्षा डॉ. गौरी कहाते यांनी केले.

त्या अथर्व ज्ञानपीठ प्रतिष्ठान, कोल्हापूर आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण प्रकल्प उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाधान माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक इरफान शेख होते. व्यासपीठावर सायबर क्राईम विभागाच्या पोलीस कॉन्स्टेबल अश्विनी लोणी, सचिन अंबलगी, किशोरस्वास्थ्य कार्यक्रमाच्या जिल्हा समन्वयक स्मिता भोसले, तसेच शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, प्रशालेतील सौ. व्ही. एस. ताटे मॅडम , सौ. निखत इनामदार मॅडम , श्रीमती. एं. एस. एम. नाईकवाडी मॅडम , श्री. अहमद शेख सर , श्री. जें. बी. पठाण सर आदी शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमात अश्विनी लोणी व सचिन अंबलगी यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन केले. फोन पे, गुगल पे किंवा कोणत्याही ऑनलाईन पेमेंट ॲपचा बेफिकीर वापर टाळावा, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, ए.आय. चा चुकीचा वापर धोकादायक ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले. सायबर गुन्हे हे गंभीर प्रकारात गणले जातात आणि त्यात अडकल्यास करिअरवरही विपरीत परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

स्मिता भोसले यांनी विद्यार्थ्यांना सकस आहार, व्यायाम व निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले.



मुख्याध्यापक इरफान शेख यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रणित महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक-शिक्षकेतर सेना यांच्या वतीने मिळालेल्या राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कारानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन आणि अथर्व ज्ञानपीठतर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

या प्रशिक्षण शिबिरात इयत्ता ७ वी ते ९ वीतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत सुकेशिनी सोनकांबळे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी, सूत्रसंचालन कल्पना गडगडे यांनी तर आभार आकाश गायकवाड यांनी मानले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# संवादातून, सर्वांच्या सहभागातून समृद्ध राज्य साकारणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; २५ हजार सरपंचांसोबत मुख्यमंत्र्यांनी साधला ऑनलाईन संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सरपंच संवाद हा 'क्यूसीआय'ने तयार केलेला प्लॅटफॉर्म, देशभरातील सरपंचांचा हक्काचा प्लॅटफॉर्म आहे. आज त्याच्यावर पंचवीस हजार सरपंचांसोबत एकावेळी आपण संवाद साधत आहोत ही अभिनंदनीय बाब आहे. या संवादातून ग्रामविकासात आलेली प्रगल्भता लक्षात येते. अशा सशक्त संवादातून निश्चितपणे आपण समृद्ध राज्य आणि समृद्ध देश तयार करू, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी आयोजित क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाद्वारा तयार केलेल्या 'सरपंच संवाद' या डिजिटल प्लॅटफॉर्मवर राज्यातील तब्बल २५ हजार सरपंचांनी ऑनलाईन सहभाग नोंदवत मुख्यमंत्र्यांसोबत थेट संवाद साधला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. यावेळी राज्यमंत्री योगेश कदम, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, भारतीय गुणवत्ता परिषदेच्या नियामक मंडळ सदस्य हिमांशु पटे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यांच्या सह अन्य संबंधित उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ग्राम विकासाशिवाय राज्याचा व देशाचा विकास होऊ शकत नाही. केंद्र सरकारने गेल्या दहा वर्षांत ग्राम विकासाला प्राधान्य देत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला. महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांच्या ग्रामसमृद्धीच्या संकल्पनेतील समृद्ध आदर्श गाव निर्माण करण्यासाठी गावाच्या विकासकामांमध्ये लोकसहभाग आणि नेतृत्व या दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरणाऱ्या आहेत.




गावांच्या सर्वांगीण विकासासाठी सरपंच हे परिवर्तनकर्ते आहेत. गावाचे नेतृत्व सरपंच करतात. त्यामुळे सरपंचांची थेट निवडणूक ही परिवर्तनाची मोठी पायरी ठरल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासनाच्या योजना गावात पोहचवून गावांचा विकास करण्याचे काम सरपंच करतात. सरंपचांनी शेतकरी, महिला, बालक, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि महिला बचत गटांसाठी केंद्र-राज्य सरकारने दिलेल्या निधीचा सर्वोत्तम उपयोग करावा. कारण विविध योजना, अभियानातून गावांमध्ये मूलभूत काम उभे करता येते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे जलयुक्त शिवार अभियानात राज्यात झालेले उल्लेखनीय काम ज्यामध्ये या योजनेने केवळ पाणी साठवणूक करत जलसंधारणाचेच काम केले नाही तर जलयुक्त शिवार अभियानातून गावात नेतृत्व, सामूहिक शक्ती यातून किती मोठ्या प्रमाणात परिवर्तन करता येते याची प्रचिती लोकांना आली. या अभियानाने शेतीतील प्रगतीची नवी दिशा दिली.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामध्ये सगळ्या गावांनी अतिशय उत्तम काम केलं आहे. राज्यातील प्रत्येक गाव स्मार्ट ग्राम बनवण्याचा संकल्प व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, फायबर नेटवर्कनंतर आता स्टारलिंकच्या सहकार्याने सर्वोत्कृष्ट इंटरनेट कनेक्टिव्हिटी गावापर्यंत दिली जाईल. स्मार्ट उपकरणांमुळे उत्पादकता वाढून शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल, असे त्यांनी सांगितले.

सौर पंप योजनेत महाराष्ट्राचा लवकरच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

सौर पंप योजना महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर यशस्वी होत असून, जागतिक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड महाराष्ट्राच्या नावावर होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. दिवसा पंप आणि रात्री घराला मोफत वीज - अशा खर्च बचतीच्या संकल्पना आता वास्तवात येत आहेत. शासन नैसर्गिक शेतीची संकल्पना मिशन म्हणून राबवणार असून उत्पादन खर्च कमी करत शेतीला शाश्वत करण्यावर भर देत आहे.

राज्य सरकार दरवर्षी ₹५,००० कोटी कृषी क्षेत्रात गुंतवणूक करणार आहे कारण शेतीत गुंतवणूक केल्यावरच शेतीची उत्पादकता, आर्थिक लाभ वाढवता येणार असून महिला बचत गट, फूड प्रोसेसिंग, ठिबक सिंचन, यांत्रिकीकरण, शेतरस्ते, सौरग्राम, मूल्यशिक्षण अशा विविध योजनांच्या यशस्वी व्यापक अंमलबजावणीमुळेच खरा विकास शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

क्यूसीआय, व्हीएसकेसी आणि अनुलोम यांच्या माध्यमातून गावांना प्रशिक्षण, तांत्रिक मदत आणि उत्कृष्टतेची संधी मिळत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, की, गुणवत्ता हीच खरी विकासाची गुरुकिल्ली आहे. विविध अभियान,स्पर्धा यांच्या माध्यमातून सरपंचांना नेहमी स्पर्धात्मक मोडमध्ये ठेवून प्रत्येक गावाला समृद्ध बनवण्याचा संकल्प सर्वांच्या सहभागाने यशस्वी करत समृद्ध महाराष्ट्र घडवू, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

उल्लेखनीय काम करणाऱ्या सरपंचांसोबत संवाद साधून मुख्यमंत्री यांनी यावेळी सर्व सरंपचांचे अभिनंदन केले. यावेळी ग्रामविकास, शेती, जलसंधारण, महिला सबलीकरण आणि स्मार्ट गाव या विषयांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मार्गदर्शन केले.

# पद्मश्री ॲड.उज्वल निकम यांची आज प्रकट मुलाखत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर,(प्रतिनिधी):- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावर गाजलेल्या विविध खटल्याचे विशेष सरकारी वकील पद्मश्री उज्वल निकम यांची प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने बुधवार दि. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजता श्री शिवछत्रपती रंगभवन मध्ये आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्षा रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली.

माझा जीवन प्रवास जळगाव ते दिल्ली व्हाया मुंबई या अंतर्गत पद्मश्री खासदार ॲड उज्वल निकम यांची मुलाखत होणार असून माधव देशपांडे हे मुलाखत घेणार आहेत. जळगावचे सुपुत्र असलेले ॲड उज्वल निकम यांनी सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील पोलीस शिपाई धुळा कोळेकर या गाजलेल्या खटल्यात विशेष सरकारी वकील म्हणून मोठी जबाबदारी पार पाडली होती. त्याचबरोबर त्यांनी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याच्या खटल्यात तसेच राज्यातील आणि देशातील विविध खटल्यात सरकारची बाजू त्यांनी योग्य प्रकारे मांडून पिडीतांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याने भारत सरकारकडून त्यांना पद्मश्री या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सध्या ते राज्यसभेचे सदस्य असून खासदार म्हणून त्यांनी नुकतेच कामकाज सुरू केले आहे. अशा या देशभक्ताचा जीवनप्रवास कसा आहे याचा उलगडा होवून आजच्या पिढीला मार्गर्शक ठरणार आहे.



### शिवछत्रपती रंगभवन मध्ये मसाप दक्षिण शाखेकडून आयोजन

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि जनजागृतीसाठी अनेक उपक्रम राबवण्यात येतात दरवर्षी दिपावलीच्या निमित्ताने ज्येष्ठ निरूपणकार विवेकजी घळसासी यांची प्रवचनमाला, महाराष्ट्राचे प्रतिभावंत साहित्यिक कवी विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या कथा, कवितांवर आधारीत विंदा एक स्मरणसाखळी हा बहारदार कार्यक्रम तसेच महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले आणि दुबईत मसाला किंग म्हणून ओळख निर्माण करणारे धनंजय दातार यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम सोलापूरातील उद्योजकांना मार्गदर्शक ठरला. मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी लेखन केलेल्या दोन पुस्तकाचे प्रकाशन अगदी थाटात करण्यात आले. त्यानंतर दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीच्या वृत्तनिवेदिका, सुप्रसिध्द निवेदिका ज्योती आंबेकर यांचे भाषण कला शिबीर हे शिबीर आणि महिलांसाठी राज्यस्तरीय पाककला शिबीर त्याचबरोबर सोलापूरचे सुपुत्र असलेले राज्याच्या आणि देशाच्या राजकारणातील सोलापूरच्या सुपुत्रांच्या मुलाखतीचा कार्यक्रम सोलापूर रंगे नेत्यांच्या संगे, महाकवी गदि माडगुळकर यांच्या स्मृती निमित्त काव्य जागर कार्यक्रम, महिलांसाठी श्रावण महोत्सव, श्री सूक्त ते राष्ट्र सूक्त, कवी अशोक नायगावकर यांच्या कवितांचा कार्यक्रम, बागेश्वरधामचे महाराज बागेश्वरबाबा यांचे प्रवचन असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यातूनच बुधवार दि. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजाता शिवछत्रपती रंगभवन येथे पद्मश्री उज्वल निकम यांच्या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नागरीकांनी मोठ्यासंख्येने उपस्थिती राहावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष प्रा.दीपक देशपांडे, कार्यवाह जितेश कुलकर्णी,कोषाध्यक्ष अमोल धाबळे,कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर, मेधा कुलकर्णी, अभय जोशी, अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर आदी कार्यरत आहेत.

# 'आंबेडकरी स्त्री संघटन' तर्फे संविधान महोत्सव-जागृती परिषदेचे आयोजन

आंबेडकरी स्त्री संघटन
जागर संविधान संस्कृतीचा - मेत्ताभावनेचा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव : २६ नोव्हेंबर २०२५ रोजी भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाले असून, त्यानिमित्ताने प्रत्येक नागरिकांमध्ये भारतीय संविधानाची जनजागृती व्हावी, त्या विषयी महत्व व संविधानाची मूल्ये कळावी. तसेच प्रबोधन व्हावे याकरिता आंबेडकरी स्त्री संघटन' आयोजित भारतीय संविधानाच्या पंच्याहत्तरीनिमित्त संविधान महोत्सव-जागृती परिषदेचे आयोजन २५ नोव्हेंबर २०२५ रोजी दादर ,आंबेडकर भवन, येथे सकाळी १० ते सायं. ६ पर्यंत करण्यात आले आहे. सदर संविधान महोत्सव-जागृती परिषदेचेच्या निमंत्रक आंबेडकरी स्त्री संघटन संस्थापक प्रा. आशालता कांबळे आहेत तर उद्घाटक सुप्रसिद्ध अभिनेता, कवी डॉ. मिलिंद शिंदे असून कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. प्रज्ञा दया पवार असणार आहेत. तर सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १० वाजता होणार असून, दुपारी १ ते २ वाजताच्या सुमारास संविधानमूल्याधिष्ठित सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. तर दुपारी ३ ते ४.३० वाजता टॉक शो होणार असून त्यात . सुनील खोब्रागडे, राही भिडे, चयनिका शाह, डॉ. कुंदा प्र. नि., हसीना खान यांचा सहभाग असणार आहे. दु. ४.३० ते सायं. समारोप, प्रमुख वक्ते म्हणून लेखक, वैदयकिय संशोधक, सामाजिक विचारवंत प्रा. डॉ. राम पुनियानी असणार आहेत. ६ पर्यंत परिषदेचा समारोप होणार आहे. तर आंबेडकरी स्त्री संघटनच्या नंदा कांबळे, पुष्पा धाकतोडे, शिरीन लोखंडे, डॉ. प्रज्ञा दया पवार, छाया खोब्रागडे, डॉ. निशा शेंडे, श्यामल गरुड, शारदा नवले, छाया कोरेगावकर, सुरेखा पैठणे, माधुरी शिंदे, वैभवी अडसूळ, मयुरा सावी सहभागी असणार आहेत.सदर कार्यक्रमासाठी सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

आंबेडकरी स्त्री संघटन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# कुमठा जिल्हा परीषद शाळेचे मुख्याध्यापक दयानंद सेलुकर यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव

औसा तालुक्यातील कुमठा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दयानंद सेलुकर यांनी शाळेचा तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल त्यांचा कुमठा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच पुढील होणाऱ्या विभागीय वक्तृत्व स्पर्धेसाठी ग्रामस्थांच्या वतीने व शाळेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.



यावेळी उपसरपंच अशोक जगताप, शालेय पोषण आहार समितीचे उपाध्यक्ष हनुमंत रेड्डी, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष लक्ष्मण ज्ञानोबा काळे, शिक्षण प्रेमी युवक ब्रह्मानंद रेड्डी, ओम गोरे, कौशल्याताई भोजने मॅडम, ज्योतीताई शिंदे मॅडम आदी उपस्थित होते. यावेळी उपसरपंच अशोक जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त केले. व कुमठा गावासह कुमठा जिल्हा परीषद शाळेचा शैक्षणिक विकास करण्यासाठी मुख्याध्यापक सेलुकर यांनी प्रयत्नशिल असावे व येणार्या काळात शाळा व कुमठा गावच्या शैक्षणिक विकासात आपल योगदान दयावे असे प्रतिपादन उपसरपंच आशोक जगताप यांनी यावेळी केले .

### घरकुल लाभार्थींचा गृहप्रवेश व चावी प्रदान

### मान्यवरांनी उपस्थित लाभार्थ्यांना केले मार्गदर्शन

# कुंरूद ग्रामपंचायत हद्दीतील शंभर नागरीकांना घरकुलांच्या चावीचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील सदन ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व चार गांव पाड्यात विस्तार असलेल्या कुंरूद गृप ग्रामपंचायत हद्दीतील घरकुलांचे बांधकाम पुर्ण करणाऱ्या नागरिकांना घरकुलांच्या चावीचे ऊत्साहात वाटप करण्यात आले.



प्रधानमंत्री जन-मन, ग्रामीण केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत तालुक्यातील कुंरूद गृप ग्राम पंचायतीच्या हद्दीतील कुरुंद, वाफाळे, दळेपाडा, वाहुली येथील १८० आदीवासी नागरीकांना शासनाकडून घरकुले मंजूर झाली असुन त्यापैकी १०० घरकुलांचे वेळेत बांधकाम पुर्ण करण्यात आले आहे. त्या घरकुल लाभार्थींचां गृहप्रवेश व चावी प्रदान करण्याचा कार्यक्रम मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी उपस्थीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलास पाटील यांनी घरकुल योजनेची माहिती देऊन उपस्थीत लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर श्रीकांत गायकर यांनी देशाचे पंतप्रधान नरेन्द्र मोदी हे प्रत्येकाला घर हा दीलेले शब्द पाळत असुन त्यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात थेट निधी देऊन विलंब आणी भ्रष्टाचाराला आळा घातल्याचे आपल्या भाषणात सांगितले.

यावेळी सरपंच दीपाली केदार, उपसरपंच निकीता जाधव, ग्रामपंचायत सदस्य योगेश (बंटी) पाटील, भाई पाटील, श्रीकांत गायकर, संदीप काठोळे, जान्हवी पाटील, विशाखा भोईर, भावना सांबरे, रेश्मा वाघे, सुनील मोरे, ग्रामपंचायत अधीकारी नितीन देशमुख सह कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलास पाटील, सामाजिक कार्यकर्ते दिलीप केदार, निकेश विशे, विनोद पाटील, जगदीश पाटील, मुकेश जाधव उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते घरकुल लाभार्थ्यांना चावीचे वाटप करण्यात आले. तर ग्रामपंचायत हद्दीतील गावामधील आदीवासी नागरीकांना घरकूल मंजुरीसाठी लागणाऱ्या ऑनलाईन कागदपत्रांसाठी संपूर्ण ग्रामपंचायत कमीटी, ग्रामविकास अधिकारी नितीन देशमुख ग्रामपंचायत कर्मचारी पंकज जाधव, रवींद्र घोडविंदे, व इतर सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली त्यांचे यावेळी नागरीकांकडुन कौतुक करण्यात आले.

# नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शामल लक्ष्मण शिरसाठ (पापरकर) यांच्या प्रचाराचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी



शहराच्या सुशोभीकरणासाठी माझी उमेदवारी शामल पापरकर पंढरपूर नगरपरिषद नारळाचे पदाच्या भाजपच्या उमेदवार श्यामल शिरसाठ यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीकडे भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे भाजप नगराध्यक्ष पदासाठी कोणाला उमेदवारी देणार. याकडे लक्ष लागले होते उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपने शामल शिरसाठ यांना उमेदवारी जाहीर केली त्यामुळे शामल शिरसाठ यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे गेल्या ४० वर्षापासून शिरसाट कुटुंब राजकारणात सहभागी आहे. त्यामुळे शिरसाट यांचे पती लक्ष्मण शिरसाठ व मुलगा विक्रम शिरसाट यांनी नगर परिषदेमध्ये नगरसेवक म्हणून काम केले आहे. शिरसाट यांची पंढरपूर शहरातील मतदारांची चांगली संबंध आहेत.

गेली ४० वर्षापासून त्यांनी त्यांच्या प्रभागांमध्ये विविध विकासकामे केले आहेत गोरगरिबांना मदत केली आहे त्यामुळे या निवडणुकीत शिरसाट यांचे पार्टी जड असलेली दिसून येत आहे शिरसाट यांच्या पाठीमागे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी मोठी ताकद उभी केली आहे तर किंगमेकर ची भूमिका उमेश परिचारक बजावित आहेत.

पंढरपूर शहरांमध्ये ओबीसी नेते जास्त असल्यामुळे भाजपने राजकीय खेळी करून ओबीसी असलेल्या श्यामल शिरसाठ यांना उमेदवारी दिली आहे त्यामुळे नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत ओबीसी विरुद्ध मराठा असा सामना राहणार असल्याचे दिसून येत आहे एकंदरीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्यामल शिरसाठ यांनी प्रचाराचा शुभारंभ केला असल्याची दिसून येत आहे.